# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

May 2020 Special Issue- 27 Vol.1

# RADIANCE

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor
Dr. Sunita Sangole
Dayanand College of Arts, Latur

# Index

1. बालकामगार निर्मुलनासंबंधी कायदे आणि धोरणांचा अभ्यास 17
प्र. प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड

2. आंबेडकरवाद : इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह 23
प्रा.डॉ.रमेश पारवे

3. साहित्य निर्मिती प्रक्रिया 27
प्रा.डॉ. सुनीता सांगोले

4. From Rags to Riches: A Thematic Study of Arthur Miller's *Death of a Salesman*. 34
Dr Prashant M. Mannikar

5. Rabindranath Tagore's Philosophy of love Depicted In The Play Chandalika 39
Dr. Machindra H. Khandagale

6. पं. दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानववाद : 43
डॉ. दिलीप नागरगोजे

7. औद्योगिकीकरण आणि मराठी कादंबरी 47
डॉ. गणेश लहाने

8. The Tradition of Marathi Sugam Sangeet 50
Dr. Devendra kulkarni

9. Active Resistance and Revolutionary Activism in MeenaKandasamy's Poetry 52
Dr. Shivkumar Bhimrao Rautrao

10. मराठी प्रमाणभाषा लेखनाच्या (शुद्धलेखनाच्या) नियमावलीचा नवीन आराखडा 58
प्रा.डॉ.सुभाष माणिकराव कदम

CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 27 , Vol. 1 May 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


# आंबेडकरवाद : इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह

डॉ.आर.एस. पारवे

संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर

---

मानवाच्या जीवनामध्ये इतिहासाला महत्त्वाचे स्थान आहे.कारण इतिहासाशिवाय मनुष्य जीवन जगू शकत नाही, भूतकाळात जे जे घडले तो आज इतिहास होतो. भूतकाळात घडलेल्या घटनांचा व विचार स्त्रोतांचा अभ्यास, त्यांची चौकशी, विश्लेषण, अर्थ व अन्वयार्थांचा शोध म्हणजे इतिहास आणि हा शोध आपण वर्तमानाच्या संदर्भात घेत असतो. इतिहासाची जाण नसलेला समाज हा स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखा असतो.

जॉन सिली हा इतिहास शास्त्रज्ञ व विचारवंत गतकाळातील घटनांचा मागोवा घेताना असे म्हणतो की, "भूतकाळातील राजकारण म्हणजेच इतिहास होय." याच भूमिकेतून गतकाळातील राजघराणी, त्यांची साम्राज्य, त्यांनी केलेली संघर्ष, लढाया, सुधारणा, धर्मप्रसार हा इतिहास अभ्यासाचा प्रमुख गाभा ठरतो. त्यामुळे जगभराच्या देशातील इतिहास लेखनात राजकीय इतिहासाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले.1 परंतु अलीकडील काळामध्ये इतिहास हा मर्यादित न राहता त्याला व्यापक असे स्वरूप प्राप्त झाले आहे, मानवी जीवनाच्या वाटचालीचा समग्र आलेख म्हणजे इतिहास होय. या संज्ञेला अलीकडे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण इतिहास हा नुसता राजे लोकांचा, त्यांच्या लढाया किंवा सुधारणा एवढेच नाही, तर इतिहासामध्ये समाजाच्या नौतिकतेच्या कल्पना, धार्मिक मूल्ये, राजकीय विचारप्रणाली, राजकीय परंपरा, साहित्य, कला, स्थापत्य यावरोबरच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, मानवी हक्क यासाठी झालेले लढे व त्यांचे विचार इत्यादीचा देखील इतिहास आहे. समाजातल्या सामान्य माणसाचा देखील इतिहास असतो.अनेक विचारातून इतिहास संशोधन आणि लेखन सातत्याने चालू राहणारी प्रक्रिया आहे.

इतिहासाची पुनर्मांडणी :

प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची परंपरा अखंडपणे चालू आहे.या लेखन परंपरेने मात्र अनेक वळण घेत नवनवीन विचार प्रवाह निर्माण केले.प्रस्थापित इतिहासातील काही विसंगती ध्यानात येतात म्हणून या तपासण्यासाठी पुन्हा शोध घ्यावा लागतो. त्यामुळे त्याची पुनर्मांडणी करावी लागते किंवा भूतकाळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो किंवा नव्याने काही पुरावे समोर येतात. वर्तमानाच्या अनुषंगाने गतकाळ शोधला जात असतो. वर्तमान बदलले की, गतकाळाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.2 त्यामुळे इतिहासाची पुनर्मांडणी देखील अनिवार्य ठरते.

भारतीय इतिहास लेखनातील प्रवाह :

वर्तमान बदलला की इतिहास लेखनातील विचार प्रवाह बदलतात व नवीन विचार प्रवाह उदयास येतो.जगामध्ये अनेक दृष्टीकोनातून इतिहासाचे लेखन झाले आहे व होत आहे.काही वेळेस इतिहास लेखनावर धर्माचा प्रभाव राहिला तर काही वेळेस राजे लोकांचा प्रभाव राहिला.अशा प्रकारे भारतीय इतिहास लेखनामध्ये काही प्रवाह निर्माण झाली.3 भारतात प्राचीन काळात धर्म आणि राजसत्ता हे समाजजीवनाचे प्रमुख घटक होते.त्यामुळे सहाजिकच जे काही लेखन झाले ते राजसत्ता, धर्म,

आगमन होण्यापूर्वी येथे नाग लोकांची साम्राज्ये होती.ही साम्राज्य व नाग राज्य अत्यंत शक्तीशाली होती.आर्य व अनार्य असलेले नाग यांच्यातील युद्ध आर्यांनी अनार्यांना गुलाम कसे केले इत्यादीचा इतिहास डॉ.आंबेडकर यांनी आपल्या लिखानातून मांडला आहे.बौद्धकाळ, ब्राह्मणी कालखंडातील शुंग, कण्व, गुप्त इत्यादी राजवटीमध्ये बौद्धांवर व शुद्रांवर झालेले अन्याय इत्यादी संबंधी डॉ.आंबेडकरांनी लिखान केलेले आहे.याबरोबरच मुस्लिम आक्रमकांच्या आगमनाच्या काळासंबंधी त्यांनी लिखान केले आहे.सम्राट अशोकाचा वैभवसंपन्न कालखंड, शुंगांनी बौद्धांच्या केलेल्या कत्तली तसेच आर्यांनी भारत भूमीवर आक्रमण करुन येथील मूळ रहिवासी असलेल्या अनार्यांना गुलाम बनवले.तसचे अनार्यांवर आपली संस्कृती व धर्म इत्यादींचे विवेचन डॉ.आंबेडकर यांनी आपल्या लिखानातून केले आहे.8 एकंदरीतच भारताच्या इतिहासाची ते नव्याने मांडणी करतात व अस्पृश्यांच्या अस्तित्वाचा शोध घेतात.

इतिहास लेखनाची दिशा स्वतः डॉ.आंबेडकर यांनी आपल्या इतिहास लिखानातून दाखवलेली आहे.डॉ.आंबेडकर यांनी आपले संपूर्ण जीवन अस्पृश्यांच्या उद्धारासाठी अर्पण केलेले आहे.मानवी मूल्य व अधिकार यासाठी सतत संघर्ष केला. अस्पृश्यांचे प्रश्न, समाजाच्या मागण्या, त्यांचे हक्क व संरक्षण इत्यादी बाबींमध्ये ते सतत लढा देत असतानाही भारतीय ऐक्याचे ध्येयदेखील आंबेडकरांनी शेवटपर्यंत सोडलेले नाही. आंबेडकरांनी केलेले हे कार्य व त्यांचे विचार म्हणजेच आंबेडकरवाद होय. या आंबेडकरवादी विचार प्रवाहातून ज्या ज्या इतिहासकारांनी इतिहास लेखन केले त्यामध्ये सर्वप्रथम डॉ. आंबेडकर हे स्वतः होते.त्यामुळे इतिहास लेखनातील आंबेडकरवादी विचार प्रवाहानुसार इतिहास लेखन करणा-यांना निश्चित दिशा मिळते. या पद्धतीने आज भारताच्या सबंध इतिहासाची नव्याने मांडणी झाली पाहिजे, कारण आजही अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्याच्या कामामध्ये निश्चित योग्य अशी दिशा मिळविण्यासाठी आंबेडकरवादी विचारप्रवाह इतिहासाचे पुनर्लेखनामध्ये गतिमान होणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ सूची :

01. डॉ. प्रभाकर देव - इतिहास एक शास्त्र, पान क्र. 12, 13

02. कित्ता - पान क्र. 280

03. डॉ. सुरेश चौथाईवाले - इतिहासाचे तत्वज्ञान, पान क्र. 192

04. कित्ता - पान क्र. 205

05. शरद पाटील - मार्क्सवाद : फुले-आंबेडकरवाद, पान क्र. 19

06. केशव मेश्राम - डॉ. आंबेडकर चिंतन, पान क्र. 35

07. डॉ. योगेंद्र मेश्राम - आंबेडकरवादी वाङ्मयीन जाणिवांची अक्षर साक्ष, पान क्र. 43

08. डॉ. अनिल शिंगारे - इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पान क्र. 98 ते 106

Current Global Reviewer


Indexed (SJIF)

ISSN 2319-8648

Impact Factor- 7.139


ISSN 2319-8648


Chief Editor
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999



SHAURYA PUBLICATION
Latur

Publisher
Shaurya Publication

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol. (I)
12 January 2019 Special Issue – 92

## भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान



राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. Ingle C.B.
Assit. Prof. Heda of Dept.History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | 'Sahibat-uz-Zamani' Jahanara Begum (1614-1681): Contribution and Prestige in Mughal Indian History | Dr. Shaikh Musak Rajjak | 7 |
| 2. | Contribution of Women saints to Kannada literature with special reference to Sunyasampadane | Dr. Nalini Avinash Waghmare | 11 |
| 3. | Contribution of Women in Hyderabad Liberation Movement | Dr. Raut Sunil Raosaheb | 16 |
| 4. | An overview on Women's Employment, Participation and Tourism in India. | Dr. B.K. Shep | 18 |
| 5. | Role of modern woman in sports: Comparative study | Dr. Madhav R. Dongre | 20 |
| 6. | उच्च शिक्षीत स्त्रिया व त्यांची राजकारणातील भूमिका | प्राचार्य डॉ. अरूण दळवे , श्रीमती पाटील वैशाली मोहनराव | 24 |
| 7. | हैदराबाद मुक्तीसंग्राम आणि विद्यार्थीनींचा सहभाग इ. स. 1918 ते इ. स. 1948 (विशेष संदर्भ मराठवाडा) | डॉ. गीतांजली भीमराव बोराडे | 26 |
| 8. | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्त्रीयांचे कार्य | डॉ. आर. एस. पारवे | 29 |
| 9. | 19 व्या शतकातील समाजक्रांतीच्या प्रणेत्या : सावित्रीबाई फुले | प्रा. डॉ. सुनिता शंकरराव कुरूडे | 32 |
| 10. | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील मॅडम मादम कामा यांचे कार्य | आम्रपाली श्रीरंग थोरात | 35 |
| 11. | आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा सहभाग व भूमिका | डॉ. प्रशांत अ. सावळे | 37 |
| 12. | स्त्री समाजसुधारक ताराबाई शिंदे | अमृता विष्णू जोगदंड | 41 |
| 13. | स्वराज्याची प्रेरक शक्ती राष्ट्रमाता जिजाऊ | प्रा.डॉ.बारहाते संजिवनी चंद्रशेखर | 42 |
| 14. | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार व कार्य | डॉ. मंजुषा बावजे | 46 |
| 15. | आधुनिक काळातील साहित्य व कला क्षेत्रातील प्रसिध्द स्त्रियांचा इतिहास | डॉ. शारदा बंडे | 49 |
| 16. | भक्ती संप्रदयातील महाराष्ट्रीय स्त्रीयांचे योगदान | प्रा. गंगणे आर. व्ही. | 51 |
| 17. | मराठा स्वातंत्र्य संग्रामातील रणरागीणी महाराणी ताराबाईचे योगदान | प्रा. भोसले राजेसाहेब गंगाधरराव | 54 |
| 18. | बौद्ध धर्म प्रसारात स्त्रियांचे कार्य | प्रा.डॉ.सुदर्शन सदाशिव क्षेत्री | 56 |
| 19. | छत्रपती. संभाजी महाराज यांच्या पत्नी येसुबाई यांच्या कार्याचा मागोवा: एक अभ्यास | डॉ. इंगळे सी.बी | 58 |
| 20. | मोगलकालीन स्त्रीयांचे भारतीय इतिहासातील योगदान | प्रा.दत्तात्रय रामकिशन मुंडे | 62 |
| 21. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीत स्त्रियांचे योगदान | प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी | 65 |
| २२. | स्वराज्य संकल्पिता : राष्ट्रमाता आई जिजाऊ | प्रा.डॉ. हरी जमाले | 68 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | 12 January 2019 | UGC Approved No. 40705

# हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्त्रीयांचे कार्य

**डॉ. आर. एस. पारवे**
*संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर*

---

आधुनिक भारताच्या इतिहासात हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे विशिष्ठ आणि महत्त्वाचे स्थान आहे. हैद्राबाद मुक्ती संग्राम म्हणजे राजकीय सत्तांतरामधील सर्वात मोठे पर्वच होते. इ.स. 1707 मध्ये मोगल सम्राट अकार्यक्षम व कमकुवत असल्याने मोगल साम्राज्यातील अनेक प्रांतातील सरदार स्वतंत्र कारभार करू लागले. त्यापैकी मोगलाचा सरदार निजाम ऊल-मुल्क हा एक होय. मीर कमरूद्दीन चिन-किलीज उर्फ निजाम ऊल मुल्क या मोगल सरदाराने 1724 मध्ये स्वतंत्र्य हैद्राबाद राज्याची स्थापना केली. मोगलांच्या दक्षिण प्रांताची राज्यकारभार सुरू केला. हाच हैद्राबाद राज्याचा पहिला निजाम राजा होता. या निजामाच्या हैद्राबाद राज्यात सद्याचा मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या सर्व प्रदेशाचे मिळून हैद्राबाद राज्य होते. 1724 ते 1948 या काळात हैद्राबाद राज्यावर एकूण सात निजाम राजे झाले. या राज्यात राजा मुस्लीम असला तरी 80% जनता हिंदू होती.

शेवटच्या निजाम राजा मीर उस्मान अलीखान यांच्या काळात हैद्राबाद राज्यात अनेक सामाजिक व धार्मिक घडामोडी उदयास आल्या. ब्रिटीशांच्या आधिपत्याखाली असलेल्या भारतीय प्रदेशात अनेक सामाजिक व राजकीय चळवळी व घडामोडी घडत असताना भारतातील बहुतांश संस्थामध्ये नागरीकाला कसलेच नागरी हक्क नव्हते. ब्रिटीश भारतात लिखानस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य होते. सभा-संमेलने घेण्याचे हक्क होते. इ.स. 1935 च्या कायद्यान्वये ब्रिटीश भारतातील नागरीकांना मुलभूत हक्क मान्य करण्यात आलेले होते. मात्र भारतातील 563 संस्थानापैकी बहुतांश संस्थानात नागरिकांना कसलेच अधिकार नव्हते. हैद्राबाद संस्थानात तर शेवटच्या निजामाच्या काळात जनतेवर अनेक निर्बंध लादले होते. इत्ते हादुल मुसलमीन ही संघटना व या संघटनेचे लष्कर म्हणले रझाकार यांच्या माध्यामातून सातव्या निजामाने जनेत्तवर अनेक निर्बंध लादून प्रचंड अन्याय अत्याचार केले.

15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली असलेल्या भारतीय प्रदेशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यापुर्वी ब्रिटीश सरकारने भारतातील संस्थानिकांच्या बाबतीत केलेल्या निवेदनानुसार भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश अस्तित्त्वात आल्यानंतर भारतातील संस्थानीकांना त्यांना भौगोलिक दृष्ट्या ज्यांना जे जवळचे राष्ट्र असेल त्या राष्ट्रात विलीन व्हावे किंवा स्वतंत्र रहावे याचे संस्थानिकांना स्वातंत्र्य देण्यात आले होते. सातव्या निजामाने 1946 मध्ये 'आझाद हैद्राबाद' ही घोषणा करून भारत किंवा पाकिस्तान मध्ये विलीन होणार नाही.... हैद्राबाद हे स्वतंत्र राष्ट्र राहील घोषीत केले व त्यामुळे 1947 मध्ये हैद्राबाद राज्यातील जनतेने निजामाची सत्ता नष्ट करण्यासाठी व हैद्राबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन करण्यासाठी निजामाविरूद्ध शसस्त्र उठाव सुरू केला. निजामाने 'रझाकार' या कडव्या अतिरेकी व मुस्लीम धार्जिनी संघटनेला हाताशी धरून जनतेवर प्रचंड अन्याय अत्याचार सुरू केले. त्यामुळे या संघर्षाने व्यापक स्वरूप धारण केले, शेवटी या संघर्षातून भारत सरकारच्या लष्करी कार्यवाहीने 17 सप्टेंबर 1948 रोजी हैद्राबाद राज्यावरील निजामाची राजवट नष्ट होऊन हैद्राबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन झाले. या सर्व संघर्षात मराठवाड्यातील विविध संघटना व व्यक्तींचे फार मोठे योगदान आहे. या बरोबरच हैद्राबाद मुक्तीसंग्रामात अनेक महिलांचेही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मोठे योगदान आहे.

**01. श्रीमती दगडाबाई शेळके :**

हरीभाऊ कुलकर्णी यांच्याकडून छ. शिवाजी महाराज, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या शौर्यकथा ऐकूण लढ्याची प्रेरणा मिळालेल्या श्रीमती दगडाबाईचा जन्म कोलते टाकळी ता. भोकरदन या गावी झाला. मुक्तीसंग्रामाच्या वातावरणाने भारावलेल्या दगडाबाईनी वयाच्या एकवीस-बावीसाव्या वर्षीच स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्या बनल्या. तर सशस्त्र संघर्षवेळी होमगाई संघटनेत भाग घेवून लष्करी प्रशिक्षणही घेतले. गावांमधून मिरवणूका काढणे, तिरंगा झेंडा लावणे, तलाठ्याचे दप्तर जाळणे, शिंदीची झाडे तोडणे, रझाकारांच्या प्रतिकारास गावराख्या ठेवणे ही कामे त्यांनी केली.

रझाकारांनी कोलते पिंपळगावावर हल्ला केला त्यावेळी स्तवः दगडाबाईनी चार तास बंदूक चालवून रझाकारांना पळवून लावले.[1] त्यांनी बऱ्याच रझाकारांना कंठस्नान घातले.

मुक्तीसंग्रामासाठी स्वतःच्या पतीला निरोप धाडून तिरंगा फडकाविल्या शिवाय मी परत येणार नाही. तुम्ही दुसरे लग्न करून संसार थाटा म्हणणाऱ्या दगडाबाईंची जातकुळी 'आधी लगीन कोंडाण्याच' म्हणून स्वराज्यासाठी स्वतःच्या घरचे कार्य बाजूला ठेवणाऱ्या वीर तानाजी मालसूरे व 'मेरी झाँसी नही दूँगी' म्हणत इंग्रजांवर तुटून पडणाऱ्या झाशीची राणी लक्ष्मीबाईची आहे हे लक्षात येते.[2]

श्रीमती दगडाबाईचे एक बहुजन समाजातील स्त्री असूनही होमगार्डच्या वेशात फिरणी अनेकांना प्रेरित करणारे ठरले.

**02. ताराबाई परांजपे :**

मुक्तीलढ्यामध्ये प्रत्यक्ष कार्य करता यावे यासाठी सामाजिक बंधनातून मुक्त होण्यासाठीच त्यांनी श्री. नागनाथराव परांजपे या प्रमुख कार्यकर्त्याशी त्यांनी लग्न केले. ताराबाइंचे पुर्वाश्रमीचे नाव - तारा दिगंबरराव आपटे होते. हैद्राबादला शाळेत शिकत असतानाच घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने वयाच्या 14-15 व्या वर्षीच कामाला सुरूवात केली. स्वामीजीच्या आदेशावरून भंगी कॉलनीमधील प्रौढ स्त्रियांना शिकविण्याचे कार्य केले. हैद्राबाद शहरात सेवादलात मुलींची संघटक म्हणून 1945 पासून कार्य केले. सत्याग्रहासाठी निधी

येथे 1936 पासून 'महिला विद्यामंदिर' चालू केले. या माध्यमातून महिलांचे प्रबोधन होत गेले. त्यामुळे महिला स्व होण्यास मदत झाली. 1944 साली नांदेडात दोन सप्ताहाचे महिला शिबीर झाले. यात 30 महिला सहभागी झाल्या हो

**08. सेलू अधिवेशन :**

इ.स. 1945 मध्ये सलू येथे महिला कार्यकर्त्यांची एक परिषद भरली. सुशीलाबाई दिवाण तिचे अध्यक्षा होत्या. यात महिलांचा मोठ्याप्रमाणात सहभाग होता.

**09. विद्यार्थीनींचा सहभाग :**

इ.स. 1947 साली अखेरचा संघर्ष पर्व सुरू झाला, तेंव्हा हैद्राबाद शहरातील सुर्यपेठ वर्धिनी हायस्कूलच्या 50 विद्यार्थीनींत यात भाग घेतला, त्या विद्यार्थीनींचे नेतृत्व तारार्बा परांजपे यांनी केले होते.[9]

**निष्कर्ष :**

हैद्रावाद मुक्तीसंग्रामात मराठवाड्यातील महिलांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतलेला आहे. वैचारीक प्रबोधन, शैक्षणिक कार्य, संमेलनात सहभाग घेणे, परिषदा घेणे, प्रत्यक्ष चळवळीत सहभागी होणे, सशस्त्र लढ्यात भाग घेणे आदी कामे मराठवाड्यातील महिलांनी मोठ्या प्रमाणेत केले. हैद्राबाद मुक्तीसंग्रामात पुरुषांबरोबरच महिलांचा सहभाग व योगदान मोठ्या प्रमाणात आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रमाणाचे हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्त्रियांनी मर्दमुकी दाखवनिली. या स्त्री क्रांतिकारक भारतीय स्त्री क्रांतिकारकांच्या पेक्षा त्याग, बलिदान, शौर्यामध्ये कणभर सरसच होत्या. त्यांचे सशस्त्र लढ्यातील सहकार्य विशेषत: शास्त्रांची ने-आण, गुप्त बातम्या पोहचविणे महत्त्वपूर्ण ठरले. महिलांच्या सहभागामुळे हैद्राबाद मुक्तीसंग्रामाला अर्थ आला.

**संदर्भ सूची:**

01. भालेराव अनंत - हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा (1987), मौज प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र. 419.
02. कित्ता, पृष्ठ क्र. 188
03. कित्ता, पृष्ठ क्र. 261
04. कित्ता, पृष्ठ क्र. 261
05. कुलकर्णी दिगंबर - हैद्राबाद मुक्तिलढ्यातील अग्निशिखा (1997), रेणुका प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र. 126
06. काबरा विजयेंद्र - अजिंठा - मराठवाडा मुक्तिसंग्राम सुवर्ण महोत्सव विशेषांक (1998), औरंगाबाद, पृष्ठ क्र. 71.
07. डॉ. रोडे सोमनाथ - मराठवाड्याचा इतिहास, विद्याबुक पब्लिकेशन, औरंगाबाद (1999), पृष्ठ क्र. 136.
08. डॉ. भालेराव शुभद्रा - अजिंठा - मराठवाडा सुवर्ण महोत्सव विशेषांक (1998), औरंगाबाद, पृष्ठ क्र. 30-31.
09. डॉ. देव प्रभाकर, हैद्राबाद मुक्तीसंग्राम, स्वा.रा.ती.म.वि., नांदेड (1999), पृष्ठ क्र. 177-189

# RESEARCH JOURNEY

**Impact Factor 6.261** **ISSN- 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S
UGC Approved Multidiciplinary international E-research journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**



Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Visit to - www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATION